PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन

**डॉ देवयानी चव्हाण**
**सहयोगी प्राध्यापक**
**गो. से. अर्थ-वाणिज्य महाविद्यालय नागपूर**
**(महाराष्ट्र) भारत**

## सारांश:-

हातात खंजिरी आणि मुखी भजन यांच्या माध्यमातून देशभक्ती व देवभक्तीचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रांतीकारी संत होते.विदर्भवासियांना अतिशय परिचयाचे, आपुलकीचे असणारे नाव. समाजाने त्यांना 'राष्ट्रसंत' ही पदवी बहाल केली. साधनेच्या अत्युच्च शिखरावरील महान तपस्वी. विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील यावली या छोट्याशा गावी गरीब कुटुंबात ३० एप्रिल १९०९ साली त्यांचा जन्म झाला. अशिक्षित माणिक आडकोबाजीसारख्या सद्गुरूंच्या संर्पकात येऊन आणि निर्सगाच्या सान्निध्यात राहून आपल्या श्रद्धा प्रखर करून, आपल्या मधुर वाणीने समाजाला जिंकून घेतले. आंतरराष्ट्रीय धर्मसभेचे अध्यक्ष शिन निगामी म्हणाले,'पंचम विश्वधर्म परिषदेस आलेल्या प्रतिनिधींमध्ये संत तुकडोजी महाराज यांनी आपल्या उच्च शिलाने, अप्रतिम बुद्धिमत्तेने व श्रेष्ठत्वाने लोकांवर विशेष छाप पाडली. माझ्या मते, भारताचे खरे उद्धारक आहेत, ते महाप्रभावी ठरतील'.सारेच करे तर्काच्या पलिकडचे. कारण

आम्ही जे तर्कानेही जाणू शकलो नाही, ते त्यांनी आपल्या काव्यातून समाजासमोर मांडले. त्यांचे कवित्व हे श्रुतंभरा प्रज्ञेतून आलेले, त्यामुळेच त्यांचे काव्य हे प्रासादिक आहे. त्यांचे भांडवल केवळ त्यांची श्रद्धा व त्यांची निष्ठा. परंतु समाजाच्या मूलभूत प्रेरणेला जागृत करण्याचे काम त्यांच्या श्रद्धेने व निष्ठेने केले. ह्याचे पडसाद आज केवळ भारतातच नाही तर अखिल विश्वात उमटत आहेत. तुकडोजी महाराजांमधील सगळ्यात भावणारा गुण कोणता असेल तर तो आहे कियाशिलता. स्वामी विवेकानंद यांच्या कार्याशी, विचारांशी नाते सांगणारे त्यांचे कियाशील संतत्व. संपूर्ण समाजाला, राष्ट्राला दिशा दाखविणारा हा नंदादीप आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. गरूकृपेचा महिमा अपार असतो. पण गुरूकृपेने शिष्यालाच गुरुपण प्राप्त व्हावे, हा महिमाच न्यारा आहे.संतवाड्.मयात असे उच्चकोटीचे उदाहरण बघायला मिळते. शिष्यत्व ही मानवी आयुष्याची सुरुवात आहे, तर गुरुत्व हा परमोच्च बिंदू. एक सत्शिष्य सद्गुरूपदाला पोहचतो व संपूर्ण समाजाची दिशाच बदलून टाकतो, ही बाब पाहिली की कियाशील संतत्वाचे मोठेपण लक्षात येते. गुरूबद्दलची भक्ती त्यांच्या साहित्यात पदोपदी आढळते.

**सांकेतिक शब्दः- समाज, राष्ट्र, वैज्ञानिक दृष्टिकोन, अध्यात्म, विज्ञान**

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा अनेक पैलूंनी विचार करता येऊ शकतो. त्यांचे धार्मिक कार्य, आध्यात्मिक कार्य, सामाजिक कार्य, राष्ट्रीय कार्य. त्यांच्या कार्याबाबतच्या विचारांचे प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात आढळते. साहित्यातील त्यांचा हा प्रवास मानवी मनाला थक्क करून सोडणारा आहे.

मूलतः अध्यात्माचा पिंड असल्याने त्यांच्या प्रत्येक प्रकारच्या विचारांचा पाया अध्यात्मच आहे. भारतीय पारंपरिक पद्धतीनुसारच ते अध्यात्माचा विचार करतात. पण त्यांचा ईश्वर हा गिरीकंदरात अथवा मंदिराच्या गाभा-यात बसलेला नाही, तर तो अज्ञानी, गरीब, निरक्षर जनतेत त्यांना दिसतो.ह्या विश्वाच्या अणुरेणुत त्यांना ईश्वराचे अस्तित्व जाणवते. आणि म्हणूनच त्यांनी आपली शक्ती, भक्ती, वाणी, लेखणी यांना शस्त्र बनवून समाजजागृतीचे कार्य केले. तुकडोजी महाराजांच्या साहित्यात वारंवार अध्यात्म व विज्ञान यांचा सुरेख संगम आढळतो.

गुरूदेव ऐसी हो दया, जग का अंधेरा दूर हो।
सदधर्म सूरज की, प्रभासे दंभ सारे चूर हो।।
अध्यात्म और विज्ञान के सहयोग से सब हो सुखी।
सहयोग समता से सही सृष्टी करे हम स्वर्ग की।।

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात हे सर्वव्यापी चालका आमच्यावर दया कर. या विचाराचा, आचाराचा, अंधकार पुर्णतः सद्विचारांनी नष्ट कर.अध्यात्म आणि विज्ञान यांचा योग्य समन्वयच जगातील मानवाला सुखी करू शकतो. कारण अध्यात्म व विज्ञान हे ऐकमेकांशिवाय अपूर्ण आहे. राष्ट्रसंतांच्या अध्यात्माचे दोन पैलू आहेत. त्यातील एक पैलू पारमार्थिक तर एक पैलू राष्ट्रीय आहे.म्हणजेच परमार्थ आणि राष्ट्रभावना ह्या एकाच आध्यात्मिक नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले तरी वावगे होणार नाही. ह्यातील पारमार्थिक बाजूस गुरूभक्ती, गुरूसेवा, त्याच्या माध्यमातून आत्मोन्नती, हा भाग महत्वाचा आहे. राष्ट्रभावना ही क्रमविकासाची साधना आहे. व्यक्तिधर्म, कुटुंबधर्म,समाजधर्म, गावधर्म व त्याचे पालन करून राष्ट्रधर्म बळकट करणे हा भावार्थ त्यात आहे.म्हणूनच त्यासाठी त्यांनी मार्ग निवडला तो भजनाचा व खंजिरीचा. भजनांच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रभक्ती, समाजभक्तीचे गुणगान केले, तर खंजिरीच्या माध्यमातून त्यांनी समाज जागा केला. समाजनिष्ठा ही त्यांची खरी आध्यात्मिकता. त्यांच्या आध्यात्मिक पैलूत कर्मकांड कोठेही नाही. समाज कर्मकांडात अडकला की समाजाची अधोगती होते ह्याची त्यांना पुरेशी जाणीव होती आणि म्हणूनच खरे अध्यात्म हे गोरगरिबांची सेवा करण्यात आहे. समाजसेवेतून आत्मोन्नती त्यांना अभिप्रेत आहे. आपल्या कार्यात सुसंगती यावी याकरिता त्यांनी 'गुरुदेवसेवा मंडळाची' स्थापना केली. त्यांच्या ग्रामगीता, समाजसंजीवनी, विवेक माधुरी, राष्ट्रनौका, कांतीवीणा, दिव्यदर्शन, ज्ञानदीप,आनंदामृत ह्यासारख्या ग्रंथातून अध्यात्म व राष्ट्रभक्ती यांचा सुरेख समन्वय आढळतो.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे उत्क्रांतीवादी संत आहेत. साहित्यात उत्क्रांतीवाद आणणारे हे विज्ञाननिष्ठ संत आहेत. विज्ञानवादी लोकांनी उत्क्रांतीवाद मांडतांना म्हटले आहे, की इतर सामान्य जीव कोटीतून उत्क्रांत होत होत मनुष्ययोनी माणसाला प्राप्त झाली. ज्यावेळी तो मनुष्य जन्माला आला त्यापूर्वी तो अनेक सर्वसामान्य जीव जन्मला व येथपर्यंत आला. या ठिकाणी विज्ञानवाद्यांचा उत्क्रांतीवाद संपतो व नेमका येथूनच

राष्ट्रसंतांचा उत्क्रांतीवाद प्रारंभ होतो. बुद्धी व इतर महÙवाच्या कार्यशक्तीच्या दृष्टीने अपूर्ण अशा जीवदशेतून उत्क्रांत होत होत मनुष्य जसा मनुष्यत्वाच्या मार्गावर आला, तसाच तो ह्या स्थानातून वर चढत जाऊन मनुष्यत्वाच्या मार्गावर आला, तसाच तो हया स्थानातून वर चढत जाऊन मनुष्यत्वातून वरिष्ठत्व, साधुत्व आणि देवत्व प्राप्त करणार आहे. उन्नत होण्याची ही नैसर्गिक प्रणाली आहे. पण ही उत्क्रांत अवस्था एकाच जन्मात प्राप्त होईल असे नाही.

कारण 'अहं ब्रह्मास्मि।'ही अनुभूती एकाच जन्मात न आल्यास आपल्या धारणाशक्तिच्या जोरावर त्याला अनेकदा मनुष्यजन्म घ्यावा लागतो व अमरत्व प्राप्त करून घ्यावे लागते व हाच खरा उत्क्रांतीमार्ग होय. ह्या उत्क्रांती मार्गात त्यांची पदोपदी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन असणारी कवने ग्रामगीतेत आढळतात. विज्ञान न शिकलेल्या राष्ट्रसंतांच्या गामगीतेत आधुनिक वैज्ञानिक ज्ञानशाखांचा समावेश तर आहेच पण ह्याशिवाय इन्टर डिसीप्लीनरी ॲपरोचही त्यात आहे. वैज्ञानिक ज्ञानशाखांमध्ये श्शरीरशास्त्र, आहारशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र, मनोविज्ञानशास्त्र, अभियांत्रिकी, पर्यावरण इ. ज्ञानशाखांचा अंर्तभाव आहे. ह्या सगळ्या ज्ञानशाखा मूल्याधिष्ठित आहेत म्हणून ह्या आंतरशाखीय आहेत. सेवेच्या माध्यमातून स्वच्छताशास्त्राचा विचार त्यांच्या विचारसरणीत आढळतो. श्शरीरशुद्धी, हृदयशुद्धी, घरशुद्धी, ग्रामशुद्धी, हा त्यांचा कमविकास आहे. ह्यात पर्यावरण शिक्षणाचासुद्धा त्यांनी विचार केला आहे. ह्या अंतर्गत आपल्या घरासमोर प्रत्येकाने फुलझाडे लावणे, बाग फुलवणे, ही कृती त्यांना महत्वाची वाटते. व्यक्ती हा अनुकरणीय असतो.चांगल्या गोष्टी समाजात अनुकरणशील ठरल्यास ग्रामोन्नती होते पण वाईट गोष्टी समाजात असल्यास समाजाची अधोगती झाल्याशिवाय राहात नाही. चांगले गुण अनुकरणाने आत्मसात होतात. ह्या सद्गुणांचे कनस्ट्रक्शन आपल्यात केल्यास त्यायोगे समाज, राष्ट्र सद्गुणी बनते. हे एक प्रकारचे तुकडोजी महाराजांनी सांगितलेले मेंटल इंजिनिअरींग आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आहारशास्त्राचा अतिशय बारकाईने विचार तुकडोजी महाराजांच्या विचार सरणीत आढळतो. भोजन घेतांना काय करावे, काय सेवन करावे ह्याचा विवेक त्यांच्या विचारसरणीत आढळतो. आधुनिक विज्ञानाने ही बाब सिद्ध केली आहे, की व्यक्ती ज्या प्रकारचे अन्न सेवन करतो, तशी त्याची विचारधारा बनते. तुकडोजी महाराजांनी नेमका

हाच विचार मांडला आहे. जेवतांना चांगला विचार का करावा? भगवंताचे नामस्मरण का करावे?

ह्याबद्दल सांगतांना ते म्हणतात-

भोजनाच्या वेळी प्रसन्न। केलीया विचार शुभचिंतन।
तैसेची भिन्नती निर्मळ गुण। अन्नासवे।।
सर्व भोजनी उत्तम भोजन। ज्यात गोधृत दुग्धप्राशन
समजावे अमृताचे सेवन। श्शरीरासाठी

आज संपूर्ण जगभर शाकाहाराचा प्रसार वाढत असताना राष्ट्रसंतांचे हे विचार महÙवाचे वाटतात. शिवाय काऊ थेरपी ही आधुनिक वैद्यकशास्त्रात फार महत्वाची मानण्यात येते. ह्याचे मूळ राष्ट्रसंतांच्या विचारसरणीत आढळते.

आधुनिक काळात 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' ह्या विचाराचा प्रचार जगभर होत आहे. वैवाहिक जीवन कसे असावे, निरोगी संतान उत्पत्ती कशी होईल ह्यासाठी सद्विचारांचे महत्व हा सगळा विचार राष्ट्रसंतांनी केला. ह्यात त्यांनी मिश्रविवाहास मान्यता दिली आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून हा विचार महत्वाचा वाटतो. शिवाय आज विवाह करताना रक्तगट महत्वाचा मानण्यात येतो. अर्थात यावेळी गुण गुणाकडे धाव घेत असतो आणि म्हणून जात-धर्म यापलीकडे गुणांना प्राध्यान्य देऊन समाजात विवाह झाल्यास होणारी प्रजा ही सशक्त असेल, असा विज्ञाननिष्ठ विचारप्रवाह त्यांनी मांडला.

समाजशास्त्र तर राष्ट्रसंतांच्या विचाराचा गाभा आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही, कारण त्यांचा कोणताही विचार, मग तो वैज्ञानिक असो, धार्मिक असो, आध्यात्मिक असो, त्यांची शुद्ध भावना आहे, ती समाजोद्धाराची, समाजपरिवर्तनाची, समाजसंवर्धनाची, रूढी, परंपरा, सण-उत्सव या सर्वांचा विचार समाजाच्या दृष्टिकोनातून त्यांनी केला. संपूर्ण समाज एकसंध व्हावा, एक दिलाने कार्यरत व्हावा, समाजातील भेदाभेद, जातीयता, सांप्रदायिकता, नष्ट व्हावी. तो श्शरीराने, मनाने बळकट व्हावा. प्रत्येक खेड्याला तीर्थस्थानाचा दर्जा मिळावा. ग्रामसुधारणा घडून यावी, हा उदात्त हेतू. हे त्यांचे समाजशास्त्रीय विचारधारेचे द्योतक आहेत. ही सर्व विचारधारा मांडत असताना त्यांना आत्मतत्वाचा विसर पडला नाही. त्यांना सद्गुरूचा, गुरूकार्याचा विसर पडला

नाही. आत्मानंद, आत्मोद्धार, आत्मानुभव, ह्याकरिता आत्मबळाची कला ही सर्वश्रेष्ठ जीवनकला आहे,असे ते मानतात. ह्या आत्मबळाने जिवास समरसता लाभते. हे आत्मबळ लाभल्यास जगात सर्वत्र सौंदर्य बघायला व्यक्ती शिकते. जग हे सुंदर व आनंदाने परिपूर्ण बनते. ही सर्व बाब गुरूकृपेशिवाय शक्य नाही आणि म्हणूनच आत्मोन्नती हीच सर्वश्रेष्ठ उन्नती आहे. 'आर्ट ऑफ लिव्हिंग' ही विचारधारा जेवढी समर्थपणे साध्या शब्दात आणि मुख्यत्वे सर्वसामान्य ग्रामीण जनतेसाठी जेवढी चांगली राष्ट्रसंतांनी मांडली तेवढी क्वचितच कुणी मांडली असेल. तुकडोजी महाराजांचा बालपणापासून अंधश्रद्धेला विरोध होता. एकदा माणिकच्या बालपणी मंजुळा आईला वेळ नाही म्हणून देवाला आंघोळ घालण्यास सांगते तेव्हा  मायची आज्ञा म्हणून माणिकने देव बादलीत घेऊन विहिरीत सोडले. बादली वर काढली. देव पुसपास करून देवघरात नेऊन ठेवले. आईने दुस-या दिवशी देव पाहिले तेव्हा देव कमी दिसले,  त्यावर माणिक आईला म्हणाला,'जाऊ देण माय त्यायची इच्छा नसंन आपल्या घरी राहायची. तसही गरीबाले देव कधी पावते का?माणिकचे हे तत्वज्ञान भोळ्या मंजुळेला कळले. माणिकने घरातला  चांदीचा  देव विकून गरिबाला भोजन देण्याची मंजुळामायची इच्छा पूर्ण केली.

ग्रामगीतेतील ईश्वर ही कोणती देवता नाही किंवा कोणता देव नाही. गामगीतेतील ईश्वर हा निसर्ग आहे. निसर्गाचे अबाधित नियम म्हणजेच ईश्वराचे नियम होत. ज्याने निसर्गाचे नियम जाणून घेतले व त्याप्रमाणे आचरण केले तेच विजयी झाले, सुखी झाले. ग्रामगीतेला हेच अभिप्रेत आहे. निसर्गाचे नियम म्हणजेच विज्ञानाचे नियम म्हणजेच आपल्या अंतराळातील शक्तीचे नियम. वंदनिय राष्ट्रसंतांना हेच अभिप्रेत आहे.

ग्रामगीतेत 'देवे निर्माण केली क्षिती', 'ईश्वर जग केले निर्माण','देवशक्ती ऐसी सर्वत्र','ईश्वर व्यापक समस्थिती','कर्म आपची फळा येती'।सृष्टीनियमे आपुली','प्रकृती पुरूषाच्या आधीन', 'निसर्ग नाना परी नटला। तो भिन्न जिवांच्या वाट्यासी आला','ईश्वरनिर्मित एकची सृष्टी', 'उभा विश्वाचिया विटेवर। सद्‌गुरू विठ्ठल सर्वेश्वर', 'ईश्वरे व्यापिले हे विश्व। म्हणोनि जगचि आम्हा देवा'अशी कितीतरी विखुरलेली वचने आढळतात. यावरून हे स्पष्ट होते की राष्ट्रसंतांना वैज्ञानिक दृष्टी होती. त्यांना विज्ञानाच्या प्रमेयांचे खोलवर ज्ञान होते. विज्ञान माहीत असूनही वं. महाराजांनी देवाला मध्यस्थ का घातले? याचे उत्तरही गामगीतेत दिले आहे. 'अहंकार न हो म्हणोनी

पूजला। सदगुरूराजा''अंगाा येईल अहंकार म्हणोन। देव मध्यस्थी घालावा' 'आम्ही आपुल्यासाठी मरतो। देव सकळांसाठी कार्य करतो। हाचि भाव त्याने स्फुरतो। देव सकळांसाठी कार्य करतो। हाचि भाव त्याने स्फुरतो। म्हणोनि धरिला देव चित्ती' अन्यथा ही देवाचिच सर्वसृष्टी। असे ग्रामगीता प्रतिपादन करते.ग्रामगीतेचा हा दृष्टिकोन कोणत्याही आस्तिक वा नास्तिक माणसाला मान्य होईल यात संदेह नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची 'अध्यात्म और विज्ञानके संयोग से सब हो सुखी' अशीच आंतरिक इच्छा होती. अध्यात्म आणि विज्ञान हे वरवर पाहणा-यांना वेगवेगळे वाटतात परंतु सुक्ष्मदृष्टीने पाहिले असता अध्यात्माची प्रमेये आणि विज्ञानाची प्रमेये वेगवेगळी नाहीत. जिथे ज्ञान आहे तिथेच विज्ञान आहे अन् जिथे विज्ञान आहे तिथेच ज्ञान आहे याची जाण ठेवूनच आजच्या काळात वाटचाल करायला हवी असे केले तरच उद्याचा भविष्यकाळ सुखसमाधानात जाईल अन्यथा जगात गोंधळ, युद्ध आणि विकार यांचेच साम्राज्य राहील हेच ग्रामगीता सांगते.

## संदर्भ ग्रंथ सूची:-

१ मानवतेचे पुजारी राष्ट्रसन्त तुकडोजी- प्रा. रघुनाथ कडवे

२ समर्थ रामदासः संत तुकडोजी तौलनिक दर्शन- डॉ. राम घोडे

३ युगद्रष्टा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज- ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक

४ ग्रामोद्धाराचे प्रणेते राष्ट्रसंत तुकडोजी- डॉ. राजशेखर सोलापुरे

५ राष्ट्रसंत वैचारिक कान्ती- डॉ. बाळ पदवाड

६ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतासार- डॉ. मनोहर रोकडे